Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357 Peer Reviewed Journal

https://doi.org/10.69758/GIMRJ/25040401V13P0004

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Apr'25
Issue–IV(I), Volume–XIII

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे महिला सबलीकरण विषयक धोरण एक अध्ययन

**प्रा.डॉ. ठकसेन दादारावजी राजगुरे**
इतिहास विभाग प्रमुख स्वा.से.श्री.क.रा.
इन्नानी महाविद्यालय, कारंजा (लाड)
जि. वाशिम.
email-tdrajgureu@gmail.com
Mob.No.9421794489

**साराऊंश**

मध्ययुगीन कालखंडात होऊन गेलेल्या शासकापैकी त्यातल्या त्यात स्त्री शासक असतांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी ज्या पद्धतीने राज्य कारभार चालवला यांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की त्यांची शासन पद्धती ही अत्यंत चोख आणि राज्यहीत साधणारी, प्रजेचे कल्याणकरणारी शासन व्यवस्था होती. या प्रजाहीतास प्रथम प्राधान्य देण्याच्या त्यांच्या तत्वामुळेच राज्यातील संपूर्ण प्रजेणे त्यांचे शासन मान्य करून प्रदीर्घ काळ टिकविण्यास मनापासून मदत केली. त्यांनी आपल्या शासन काळात आर्थिक बाजू कशी भक्कम राहील याकडे जातीने लक्ष दिले यामुळेच त्यांचा शासन काळ आर्थिक दृष्ट्या संप्पन्न होता. सोबतच त्यांनी तत्कालीन व्यवस्थेत स्त्रियांचे परा वलंबित्व दूर करून स्त्री सर्वच दृष्टीने कशी सक्षम होईल याकडे लक्ष पुरविले. स्त्रियांच्या सब्लिकरनाकरिता स्रियांना मुख्य प्रवाहात आणण्या करिता अनेक योजना आखून प्रत्यक्षात अंमलबजावणी केली. या त्यांच्या कार्यामुळे त्या प्रथम स्त्री उद्धारक म्हणून माणल्या गेल्यात. योग्य शासक आणि सोबतच स्त्री उद्धारक म्हणून त्यांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**कळीचे मुद्दे.**

जनकल्याण =राज्यातील सामान्यातील सामान्य जनतेचे हीत साधने. भटके =ज्यांना उत्पनाची कोणतीच साधने नाहीत अशी. निराधार =ज्यांना जगण्याकरिता कोणताही आधार नाहीत असे परित्यकता =पतीने सोडलेल्या स्त्रिया.हुंडा बंदी =विवाह प्रसंगी दिला आणि घेतला जाणारा व्यवहार बंद. स्त्रिदल =सैन्यात श्रीयांचा सहभाग. वडिलोपार्जित =आपल्या पूर्वजाणे कमवून ठेवलेले. कुटीरउद्योग =गृह उद्योग. महिलांश्रम =महिलांचे एकत्र राहण्याचे ठिकाण. अन्नछत्रालाय =गरजूना मोफत जेवण देण्याचे ठिकाण.

**प्रस्तावना-**

मध्ययुगीन भारतीय इतिहासात ज्या काही महत्वपूर्ण स्त्री प्रशासक होऊन गेल्यात यामध्ये राजमाता, राष्ट्र माता मा जीजाऊ, महाराणी येशूबाई, महाराणी ताराबाई अशा एका पाठोपाठ एक ज्ञानी आणि गुणी आणि धोरणी महिला प्रशासत्राः स्वराज्यास लाभाल्यात यांच्या प्रशासन कौशल्यामुळेच तत्कालीन सर्व शक्तिमान मोगल शासकास आपले मनसुबे हवेत सोडावे लागलेल सबंध भारतभर सत्ता, पैसा, बलाढ्य फौज, एकापेक्ष्या एक पराक्रमी सरदार त्यांचे कडे असून सुद्धा त्यांना स्वराज्य जिंकता आले नाही संपविता आले नाही. यातच वरील सर्व कार्यकुशल स्त्री प्रशासकांचे पराक्रम योगदान सामावलेले दिसून येते

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Apr'25
Issue–IV(I), Volume–XIII
https://doi.org/10.69758/GIMRJ/25040401V13P0004

मराठा साम्राज्याच्या उत्तर काळात असंच उदयास आलेले आणि स्वकष्टाने उत्तम प्रशासक बनलेले एक व्यक्तिमत्व म्हणजेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हे एक अद्‌वितीय व्यक्तिमत्व होय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी आपले प्रशासन चालवीत असताना राज्य वाढविण्या पेक्षा जनतेच्या कल्याणास प्राधान्य दिले, राज्यातील गरीबातील गरिबांना अधिकाधिक सुख सोयी कशा उपलब्ध करून देता येईल. राज्यातील शेतकरी, शेतमजूर, व्यावसायिक, कारागीर, बेरोजगार, भटके, स्त्रीया, अंध-अपंग, निराधार, परित्यक्ता अशा सर्वच घटकांना दृष्टीपुढे ठेवून त्यांच्या सबलीकरणावर विशेष भर दिल्याचे दिसून येते, सर्व धर्मियांना मानवेल असे वातावरण आपल्या सुयोग्य, निधर्मी, मानवतावादी प्रशासन निर्माण करून 'जनकल्याण' हेच आपले धेय्य निश्चित करून उणी-पुरी 29-30 वर्षे इंदोर, महिष्मती येथून आपल्या ज्याचा कुशल असा राज्यकारभार चालवून जनकल्याणाचाच ध्यास घेतला. या त्यांच्या निष्पक्षपाली कार्यकर्तुत्वामुळेच राज्यातील जणतेनी त्यंना माता, देवी, पुण्यश्लोक अशा ज्या अनेक पदव्या दिल्यात. त्या वेळी आजच्या प्रमाणे कोणलाही पदवीदान समारंभ केल्या गेला नाही किंवा गाजावाजा करण्यात आला नाही. तरी सुद्‌धा आज 300 वर्ष उलटल्या नंतर ही त्यांना दिल्या गेलेल्या पट्ट्या आज तागात टिकून आहेत. यातूनच त्यांचे उत्तम प्रशासक म्हणून जे स्थान इतिहासाचे पाणी लिहिल्या गेलेत ते सार्थ असल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या प्रशासनातील अनेक महत्वाच्या घटकांपैकी स्त्री सबलीकरणाचा घटक विशेष असल्याचे नमूद करावेसे वाटते.

कारण मुस्लीम राजवटीच्या काळात स्त्री हा एक दुर्लक्षित घटक मानल्या जात होता. तत्कालीन परिस्थितीमुळे सामान्य जणांनी येथील स्त्रियांवर अनेक बंधने लादून स्त्रियांचे सर्वच हिरावून घेण्याचे दिसून येते. स्त्री हि एक भावनाशुन्य घटक असल्याप्रमाणे तत्कालीन पुरुष प्रधान संस्कृती वागत होती. अशा काळात स्त्रियांचे हक्क, अधिकार जोपासण्याचे तिच्या भावनांची दखल घेण्याचे, स्त्री सबलीकरण घडवून आणण्याचे काम अहिल्यादेवी होळकरानी मध्ययुगीन काळात केल्याचे दिसून येते. त्यांच्या कार्याचा आढावा पुढील ठळक मुद्द्यांचे आधारे समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न.

**हुंडाप्रथा विरोध :-** मध्ययुगीन काळात विवाह प्रसंगी सुरु असलेली हुंडा पद्धती हि स्त्री सन्मानाचे दृष्टीने अयोग्य असल्यामुळे सदर प्रथा बंद कार्यात यावी असा अलिखित कायदाच त्यांनी करून टाकला. या सदर्भात "नववधूला एकीकडे देवी म्हणावे, लक्ष्मी म्हणावे तिची आरती पूजा करून तिचा स्वीकार आणि सन्मान करावा. आणि विवाह प्रसंगी हुडा स्वीकारावा, घ्यावा हि बाब अयोग्य असल्यामुळे त्यांनी यासंदर्भात आपल्या राज्यात नियमच केल्याचे म्हटल्या जाते. यावरून हुडा प्रथेस विरोध करणारी ती प्रथम समाज सुधारक असावी.

**सतीप्रथा बंदी** :- मध्यकालीन भारतात स्त्रियाचे सर्वस्व लपविणारी अमानवीय अशी सती प्रथा सुरु होती. हि बाबा अत्यंत वाईट आणि निष्ठुर असून अयोग्य असल्यामुळे आणि पती निधनानंतर मुलाचे पालन पोषण संगोपन करण्याचे दृष्टीने आणि कुटुब आणि पती नंतर त्याचे उर्वरित कार्य सावरण्याचे आणि चालविण्याचे करिता स्त्रीने सतो जाऊ नये. यापुढे आपला देह हा आपल्या मुलांकरिता कुटुंबाकरिता आणि राष्ट्र हिताकरिता सत्कारणी लालावावा असा आदर्श इ.स. १७५४ साली स्वकृतीतून समाजापुढे घालून दिला आणि यापुढे स्त्रिया सती जाणार नाहीत असा अलिखित पायंडा मर्माण केला. हि बाब स्त्री सबलीकरणाची आणि मानवतावादाची एक आदर्श असी

https://doi.org/10.69758/GIMRJ/25040401V13P0004
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Apr'25
Issue–IV(I), Volume–XIII

धारणा होय. सह बंदीच्या केलेल्या प्रयत्नावरून त्या सातीबंदी पुकारणाऱ्या प्रथम समाज सुधारक होय असे म्हणावे लागेल.

**स्त्रीदल निर्मिती :-** पुण्यस्लोक अहिल्यादेविनी स्वत बालपणीच अत्मरक्षणाकरिता तीरकमठा चाल वीण्याचे शिक्षण प्राप्त केले. जेव्हा त्या होळकर राज्याच्या प्रमुख बनल्यात तेव्हा स्त्रियाना लष्करी शिक्षण देऊन आत्म रक्षणाकरिता सज्ज बनविले याचाच उपयोग करून राज्याच्या रक्षणाकरिता स्त्रीदल उभारलेल आणि स्त्रियांना आत्म रक्षणासोबालच राष्ट्र रक्षणाचे कार्यात सामावून घेवून लष्करी दृष्ट्या राज्य बलशाली बनविले. मध्ययुगातील शासकांपैकी त्या आद्य स्त्रीदल निर्मात्या म्हणाव्या लागेल.

**वडिलोपार्जित संपत्तीत वाटा :-** स्त्रियांना मनाचे सन्माचे जीवन जगता यावे या करिता अहिल्याबाईने वडिलोपार्जित संपत्तीत स्त्रियांचा वाटा असावा असा नियमच होळकर राज्यात बनवून स्त्रीच्या उत्पन्नाची सोय करून तिला आर्थिक दृष्ट्या सबळ बनवीण्याचा जानिवपूर्वक प्रयत्न केला. यावरून त्यांचा आर्थिक साक्षरतेचा दृष्टीकोन स्पष्ट होतो.

**कुटीरउद्योगाची निर्मिती** :- त्यांनी आपल्या राज्यात स्त्रियांकरिता कुटीर उद्योग/गृह उद्योग स्थापन केलेत. याकरिता आजच्या महिला बचत गटासारखे संघ स्थापन करून स्त्रियाना उत्पन्नाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील करून घेवून स्वावलंबी बनविले.

**महिलाश्रामाची निर्मिती :-**आपल्या राज्यातील अत्यंत गरीब, मागास, परित्यक्ता, विधवा, वृद्ध, निराधार, अन्याय, अत्याचारग्रस्त अशा अभागिनी स्त्रियांना सुद्धा आपले जीवन बोज वाटूनये या मानवतावादी भावनेतून त्यांनी अशा स्त्रियांकरिता अनाथालय, महिलाश्रम जाणीवपूर्वक निर्माण करून त्यांना आपल्या कार्यात गुंग करून त्यांचे असाहय्य जीवन सुसाहाय्य बनवून दिले. त्यामुळे त्यांना सुद्धा स्वाभिमानी जीवन जगला आलेल. यामुळे अहिल्याबाई होळकर या स्त्री साबलीकारांच्या आद्य प्रणेत्या होत्या महिला सुधारक, महिला उद्धारक होय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**अन्नछत्रालयाची निर्मिती :-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी आपल्या राज्यात कुणीही अन्नाविना उपाशी राहू नये. आजच्या शब्दात कुपोषण होऊ नये सर्वाचे पोषण व्हावे या प्रामाणिक आणि मानवतावादी भावनेने राज्यातील अंध-अपंग, वृद्ध, निराधार, दारिद्रय, अनाथ, असाहय्य अशा सर्वच धकास दोन वेळचे पोटभर जेवन मिळावे असे प्रशासनास आदेश देऊन आपल्या राज्यभर आणि राज्याच्या बाहेर सुद्धा अनेक अन्नछात्रालये, धर्मशाळा बाल्यात. त्यास वर्षासने देऊन त्यांचे मानवताब्दी कार्य नियमित सुरळीत चालत राहावे यात खंड पडू नये अशी पुरती व्यवस्था करून दिली. को पूजाही गाजावाजा न करता किंवा कोणतीही जाहिरात, आजच्या प्रमाणे व्यानारबाजी न करता हे सर्व मुकाटपणे केलेत. त्यांच्या या मानवतावादी आणि निस्वार्थ कार्यामुळेच त्यांना जनतेनी अनेक पदव्या बहाल केल्यात आणि त्या आज तागायत टिकून आहेत हे विशेष.

सारांश थोडक्यात मध्ययुगीन काळातील शासक आणि स्त्री शासक बनलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या एका चौंडी गावाच्या सामान्य पाटील घराण्यातील असल्यामुळे आणि त्यांचा वावर बालपणापासूनच समाजात मुक्त

असल्यामुळे आणि होळकर घराण्याल सून म्हणून आल्यानंतर त्यांना दरबारात जाण्याचे बसण्याची जबाबदारी आल्यामुळे प्रजेच्या सुख दुखाची त्यांना जवळून माहिती मिळाली. आपल्या राज्यातील स्त्री-पुरुष, अबाल वृद्ध गरीब-श्रीमंत, लहान-मोठे सर्वच सुखी राहावेत हाच त्यांचा मानवतावादी दृष्टीकोन बनला, याकरिता त्यांनी जाणीव पूर्वक प्रयत्न केलेल. आपल्या राज्यातील गरीबात गरीब घटकांना अधिकाधिक सुखी आणि समाधानी कसे बनविता येईल हाच त्यांचा ध्यास होता या त्यांच्या कल्याणकारी दृष्टीमुळेच त्याचे लक्ष स्त्रियाचे स्थिती कडे गेले. त्या सुद्धा एक स्त्री घटक असल्यामुळे त्यांच्या वाट्याला जे काही जीव घेणे प्रसंग आलेत तेव्हा त्यांना त्या प्रश्नाची अधिकच तीव्रता जाणवली. यामुळेच त्यांनी आपल्या राज्यात हुडा पद्धती. सती प्रथा पद्धती बंद करण्याचा निर्धार केले स्त्रियांना स्वावलंबी जीवन जगता यावे म्हणून वडिलोपार्जित संपतीमध्ये स्त्रियांचा वाटा राहावा हे ठरवून दिले स्त्रियांना आत्म रक्षण करता यावे करिता सैनिकी शिक्षण देण्याची सोय केली स्त्रियाना आर्थिक मिळकत मिळावी या करिता गृह उद्द्योग सुरु केलेल. समजतील अभागिनी, परीक्त्यक्ता, अनाथ, निराश्रित, सियांना सुद्धा मानाचे आणि सन्मानाचे जीवन जगता यावेत या करिता महिलाश्रम निर्माण करण्यात येवून त्यास नियमित आणि निश्चित उत्पन्न मिळावे याकरिता कायमची उत्पन्नाची सोय लाऊन दिली अशा सर्वच मानवता वादी आणि स्त्री उधराच्या, स्त्रियांच्या सन्मानाच्या त्यांच्या कार्यावरून त्या स्त्री सबलीकरणाच्या आद्य पुरस्कर्त्या म्हटल्यास वावगे ठरणार नाही एकंदरीत मध्ययुगीन काळातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी केलेले मानवतावादी, स्त्री सबलीकरणाचे संदर्भात केलेले भरीव कार्य वर्तमानातील सर्वानाच प्रेरक आहे. आणि भविष्यालील सर्वानाच प्रेरक राहील.

**सदर्भ ग्रंथ-**

1. भागवत अ.ना. होळकरशाहीतील ऐतिहासिक स्त्रियांचा पत्रव्यवहार-खंड-12 अ.ना. भागवत 1925

2- भागवत अ.ना. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने-खंड-1 होळकर सरकार पुस्तकमाला

3-साने काशीनाथ नारायण होळकरांची कैफियत का. मा. साने डेक्कन कॉलेज शालिवाहन शके १८०८

4-इंगळे राम डॉ. अहिल्याबाई होळकर विद्याभारती प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती इ.स.१९९४

5-गोखले किंवा दा अहिल्याबाई होळकर श्रीलेखन वाचन भंडार, पुणे 1949

6-ठाकूर वा. वा. होळकर सहीचा इतिहास भाग-1, होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदौर इ.स. १९४५

7-पाटील डॉ. सुलोचना अशोक होळकर कुलभूषण अहिल्यादेवी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, प्रगती मंडळ जळगाव, प्रथमावृत्ती इ.स. 2000

8-पुरुषोत्तम श्री अहिल्याबाई होळकर चरित्र अनंत आत्माराम मोरमकर मुंबई आवृत्ती पहिली. इ.स. १९३३

9-जहागीरदार विजया, महाराष्ट्राचे शिल्पकार तेजस्विनी अहिल्याबाई होळकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, तृतीय आवृत्ती फेब्रुवारी २००६